*ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी श्री. हिरालाल सोनवणे



ठाणे दि.25 फेब्रुवारी २०१९ : ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी श्री. हिरालाल सोनवणे यांची नियुक्ती झाली. त्यांनी गुरुवार २१ फेब्रुवारी २०१९ रोजी पदभार स्वीकारला. श्री. सोनवणे हे २०१० च्या भारतीय प्रशासन सेवेचे अधिकारी आहेत. यापूर्वी ते कोकण विभागाचे अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत होते.

सोनवणे हे काळखेडे ता.जामनेर येथील रहिवाशी आहेत. सामान्य परिस्थितीवर मात करून त्यांनी जिद्दीने व मेहनतीने शिक्षण घेतले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत त्यांची १९९२ मध्ये उपजिल्हाधिकारी पदावर निवड झाली.

श्री. हिरालाल सोनवणे यांनी जिल्हा परिषद शाळेमधून प्राथमिक शिक्षण काळखेडे ,वाघारी येथून तर माध्यमिक शिक्षण श्री. शिवाजी हायस्कूल पारोळा येथून घेतले. गव्हर्नमेंट पोलिटेकनिक येथून डिप्लोमा इन फार्मसी हा कोर्स पूर्ण केला. त्यानंतर पुणे विद्यापीठातून बी.ए, व एम.ए चे शिक्षण पुणे येथे पूर्ण केले. त्यानंतर नोकरीत असताना सिद्धार्थ कॉलेज, मुंबई एल.एल.बी.चे शिक्षण पूर्ण केले.

१९९०-१९९२ या कालावधीमध्ये आयोगामार्फत उपजिल्हाधिकारी म्हणून परिविक्षाधीन अधिकारी म्हणून रावेर जिल्हा जळगाव येथे कार्यरत होते त्यानंतर प्रांताधिकारी , नंदूरबार व प्रांताधिकारी शिरपूर या पदावर देखील कामकाज केले .

पुढे खाजगी सचिव म्हणून मंत्रालयात कार्यरत होते . त्यानंतर मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई शहर, अपर जिल्हाधिकारी मुंबई, नियंत्रक अतिक्रमण व निष्कासन बांद्रा, अपर विभागीय आयुक्त नाशिक अशा विविध पदावर काम केले आहे. गेल्या १० वर्षापासून प्रलंबित असलेल्या जमिनीच्या केसेसचा पूर्णपणे निपटारा करून आपल्या कार्याचा ठसा उमटवला .

# ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी हिरालाल सोनवणे



ठाणे दि २५ (प्रतिनिधी)- ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी हिरालाल सोनवणे यांची नियुक्ती झाली. त्यांनी गुरुवार २१ फेब्रुवारी २०१९ रोजी पदभार स्वीकारला. सोनवणे हे २०१० च्या भारतीय प्रशासन सेवेचे अधिकारी आहेत. यापूर्वी ते कोकण विभागाचे अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत होते.सोनवणे हे काळखेडे ता.जामनेर येथील रहिवाशी आहेत. सामान्य परिस्थितीवर मात करून त्यांनी जिद्दीने व मेहनतीने शिक्षण घेतले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत त्यांची १९९२ मध्ये उपजिल्हाधिकारी पदावर निवड झाली. हिरालाल सोनवणे यांनी जिल्हा परिषद शाळेमधून प्राथमिक शिक्षण काळखेडे ,वाघारी येथून तर माध्यमिक शिक्षण शिवाजी हायस्कूल पारोळा येथून घेतले. गव्हर्नमेंट पोलिटेकनिक येथून डिप्लोमा इन फार्मसी हा कोर्स पूर्ण केला. त्यानंतर पुणे विद्यापीठातून बी.ए, व एम.ए चे शिक्षण पुणे येथे पूर्ण केले. त्यानंतर नोकरीत पान २ वर

## अधिकारी पदी हिरालाल सोनवणे

असताना सिद्धार्थ कॉलेज, मुंबई एल.एल.बी.चे शिक्षण पूर्ण केले.१९९०-१९९२ या कालावधीमध्ये आयोगामार्फत उपजिल्हाधिकारी म्हणून परिविक्षाधीन अधिकारी म्हणून रावेर जिल्हा जळगाव येथे कार्यरत होते त्यानंतर प्रांताधिकारी , नंदूरबार व प्रांताधिकारी शिरपूर या पदावर देखील कामकाज केले .पुढे खाजगी सचिव म्हणून मंत्रालयात कार्यरत होते . त्यानंतर मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई शहर, अपर जिल्हाधिकारी मुंबई, नियंत्रक अतिक्रमण व निष्कासन बांद्रा, अपर विभागीय आयुक्त नाशिक अशा विविध पदावर काम केले आहे. गेल्या १० वर्षापासून प्रलंबित असलेल्या जमिनीच्या केसेसचा पूर्णपणे निपटारा करून आपल्या कार्याचा ठसा उमटवला .

Scanned by CamScanner